# कुलगुरू 'एआयसीटीई'ला पत्र पाठविणार

पुणे, दि. १७ (प्रतिनिधी) : विद्यार्थ्यांच्या प्रवेशातील फसवणुकीसंदर्भात अखिल भारतीय तंत्रशिक्षण संस्थेला (एआयसीटीइ)ला पत्र पाठविण्यात येणार आहे. अशा संस्थांवर अंकुश बसविण्यासंदर्भात एआयसीटीईने पावले उचलावीत, असे आवाहन या पत्राद्वारे केले जाईल, असे आश्वासन कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींना दिले.

या संदर्भात शहरातील प्रमुख विद्यार्थी संघटनांच्या वतीने कुलगुरूंना प्रत्यक्ष भेटून आज निवेदन देण्यात आले. या निवेदनाद्वारे, मारुंजी येथील अलार्ड इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट या संस्थेमध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण मंडळाची ६० जागांची पी. जी. डी. बी. एम. या अभ्यासक्रमाची क्षमता असताना ५४ अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन फसवणूक केली आहे, अशी तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे. त्यापार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठाच्या कार्यकक्षेत काही संस्था पुणे विद्यापीठाची संलग्नता घेऊन काही

## विद्यार्थ्यांची फसवणूक टाळण्यासाठी आश्वासन

अभ्यासक्रम सुरू करतात व त्याच्या जोडीला स्वायत्त अभ्यासक्रम अशी गोंडस जोड देऊन लाखो रुपयांचे शुल्क वसूल करतात. त्यामुळे पुणे विद्यापीठाची संलग्नता असल्याचे भासवून सरळसरळ फसवणूक केली जाते. हे प्रकार थांबविले पाहिजे. या प्रकरणी लक्ष घालून संस्थेची मान्यता रद्द करावी, तसेच अशा संस्थांच्या तक्रारींसंदर्भात स्वतंत्र तक्रार केंद्र स्थापन करावे, अशी मागणी करण्यात आली होती. त्यावर कुलगुरूंनी हा विषय पुणे विद्यापीठाच्या अखत्यारीत पूर्णपणे येत नसला, तरीही आपण अशा संस्थांवर लक्ष ठेवण्याचे आवाहन करणार आहोत, असे आश्वासन दिले.

अखिल भारतीय विद्यार्थी संघटनेचे दिलीपसिंग विश्वकर्मा, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे उपाध्यक्ष विजय कदम, अखिल भारतीय विद्यार्थी सेनेचे सुदेश गुंजाळ, युवक काँग्रेसचे नीलेश बोराटे, पुणेकर विद्यार्थी कृती समितीचे शैलेश बडदे, स्टुडंट्स वेल्फेअर असोसिएशनचे सुरेश जैन, मनसेचे प्रदीप साखरे यांनी कुलगुरूंची भेट घेतली.

लोकमत 18/12/07

# सद्यपरिस्थितीतील आर्थिक मंदी म्हणणे अयोग्य : जाधव

पुणे, दि. १८ (प्रतिनिधी) : देशाच्या एकूण आर्थिक विकासाचा दर जरी खाली असला, तरीही सध्याच्या परिस्थितीला आर्थिक मंदी म्हणणे सर्वस्वी अयोग्य आहे, असे स्पष्ट प्रतिपादन अर्थतज्ज्ञ व पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले. मात्र, याचा अर्थ आर्थिक संकट नाही, असा अर्थ घेऊ नये. आगामी दोन वर्षे हे वातावरण राहील, हे लक्षात घेऊन सर्व उद्योगांनी कंबर कसली पाहिजे, असा सावधानतेचा इशाराही त्यांनी दिला.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरच्या 'इको पॉलिसी फोरम'चे औपचारिक उद्घाटन आज झाले. त्या वेळी ते बोलत होते. 'जागतिक मंदी व त्याचे भारतावरील संभाव्य परिणाम' या विषयावर अर्थतज्ज्ञांनी चर्चा केली.

डॉ. जाधव पुढे म्हणाले, की जागतिक आर्थिक मंदीचे पडसाद भारतातही जाणवणे स्वाभाविक आहे. परंतु, विद्यमान आर्थिक स्थितीचे वर्णन आर्थिक व्यवस्थेची मंद गती (इकॉनॉमिक स्लो डाऊन) असेच होऊ शकते. देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पादनामध्ये दोन तिमाहींमध्ये घट झाली, तर तांत्रिक परिभाषेत त्यास मंदी संबोधले जाते; परंतु चालू आर्थिक वर्षातील वाटचाल पाहता त्या परिभाषेत बसू शकेल, अशी परिस्थिती नाही. त्यामुळेच भारतामध्ये आर्थिक मंदी आहे, असे वर्णन करणे अयोग्य आहे. देशाच्या विकासाचा दर ६ ते ७ टक्क्यांवर या वर्षी राहण्याचा अंदाज असून, हा दर खाली आला असला, तरीही हा सशक्त असाच दर आहे.

डॉ. जाधव पुढे म्हणाले, की नफ्याच्या प्रमाणात अंमळ घट सोसून ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत वस्तू द्या, असे आवाहन वित्तमंत्र्यांनी केलेले असताना उद्योगक्षेत्राने मात्र या आवाहनाला तितकासा प्रतिसाद दिला नाही, ही खेदाची बाब आहे. सध्याची आर्थिक मंदी नसली, तरीही आर्थिक संकट निश्चितपणे असल्याने उद्योगांनी कंबर कसून उत्पादन खर्चात कपात, उद्योगाच्या नव्या वाटा धुंडाळणे असे उपाय राबविले पाहिजे.

बँक ऑफ बडोदाच्या मुख्य अर्थतज्ज्ञ डॉ. रूपा रेगे नित्सुरे म्हणाल्या, की आर्थिक संकट ही संधी मानून उद्योगक्षेत्राने उत्पादकता व तंत्रज्ञान सुधारणा, व्यवसायांची पुनर्रचना, आर्थिक परिस्थितीवर लक्ष ठेवून लवचिक धोरणांचा अंगीकार करणे आवश्यक आहे.

फोरमचे अध्यक्ष गोखले अर्थशास्त्र संस्थेचे डॉ. राजस परचुरे यांनी फोरमची भूमिका विशद केली. मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अशोक चोप्रा यांनी प्रास्ताविक केले. चेंबरचे संचालक अनंत सरदेशमुख यांनी स्वागत केले.

लोकमत 19/12/07

# भारत मंदीच्या जवळही नाही : कुलगुरू

## संघटित कामाची गरज : नकारात्मक घट असल्यास मंदी

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १८ : जागतिक मंदीमुळे देशातील उद्योगांच्या वाढीवर थोडा परिणाम होणार आहे. मात्र, भारत मंदीच्या जवळपासमुद्धा नाही. आगामी काळात संघटित होऊन काम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू नरेंद्र जाधव यांनी गुरुवारी केले. 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर'च्या (एमसीसीआयए) 'इकॉनॉमिक पॉलिसी फोरम'चे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले.

ते म्हणाले, "जागतिक मंदीचा किंचित परिणाम भारतावर झाला असून, गेल्या पंधरा वर्षांत प्रथमच औद्योगिक उत्पादन दरात (आयआयपी) घट झाली आहे. भारतात आर्थिक सुधारणा १९९१ मध्ये झाल्या आणि त्यानंतर दहा वर्षांत एकूण देशांतर्गत उत्पादनवाढीचा दर (जीडीपी) सहा टक्के, २००२-२००५ मध्ये 'जीडीपी' आठ टक्के, तर २००५-०८ यादरम्यान सात टक्क्यांनी वाढ झाली आहे. सलग दोन तिमाहीत वाढीचा वेग नकारात्मक राहिल्यास मंदी आल्याचे स्पष्ट होते. मात्र, भारतात अशी परिस्थिती नाही. जागतिक मंदीमुळे अर्थव्यवस्थावाढीचा वेग सहा टक्क्यांवर राहण्याची अपेक्षा आहे."

"सवलती न मिळाल्यास कर्मचारीकपात करण्यावाचून आम्हाला पर्याय नाही, अशी भीती काही कंपन्या सरकारला दाखवीत आहेत. मात्र, वाढीचा वेग मंदावणार असल्याने सरकार आणि उद्योग क्षेत्राने मिळून काम करण्याची गरज आहे. भारतीय वित्तीय धोरणांना नावे ठेवणारे आता भारताच्या भूमिकेचे समर्थन करीत आहेत. देशातील वित्तीय प्रणाली धोरणांमुळे सुरक्षित आहे. अमेरिकेत फेडरल रिझर्व्हचे थेट नियंत्रण संस्थांवर नसल्याने 'सब-प्राइम'चा प्रसंग ओढवला," असे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले, "मंदीतून बाहेर येण्याच्या तीन अवस्था आहेत आणि इंग्रजीच्या यू, व्ही आणि एल या अक्षरांप्रमाणे त्या आहेत. यातील 'यू' आकाराची अवस्था ही सहा ते आठ महिन्यांची असते, तर 'व्ही' आकाराची अवस्था ही दोन वर्षांची; तसेच 'एल' आकाराची अवस्था आठ ते दहा वर्षांची असते. 'एल' अवस्थेतून सध्या जपानची अर्थव्यवस्था जात आहे. सध्याची मंदीसदृश परिस्थिती संपण्याचा कालावधी 'व्ही' आकाराप्रमाणे असू शकतो."

सकाळ 19/12/07